महाराष्ट्र शासन

# उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. 402 201

दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: ब/20/जमिन/व.सं./2731 /2021-22 दिनांकः- 8 /11/2021

प्रति,

कार्यकारी अभियंता,
हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग,
कामार्ली ता.पेण जि.रायगड

विषयः- **वन जमिन रायगड**
सांबरकुंड मध्यम प्रकल्पाकरीता वनक्षेत्र मागणी प्रस्ताव क्षेत्र 237.38 हे.

संदर्भः- 1) आपलेकडील पत्र क्र. हेमप्रवि/825/2021, दि.13/05/2021.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/वसं/755, दिनांक 03/6/2021.
3) आपलेकडील पत्र क्र. हेमप्रवि/1398/2021, दि.31/08/2021.
4) आपलेकडील पत्र क्र. हेमप्रवि/1720/2021, दि.25/10/2021.

आपण संदर्भिय पत्रान्वये सांबरकुंड मध्यम प्रकल्पाकरीता वनक्षेत्र मागणी प्रस्ताव क्षेत्र 237.38 हेक्टर वनजमिन मागणीचा प्रस्ताव या कार्यालयास एक प्रतीत या कार्यालयास सादर केलेला होता. त्यामध्ये आढळून आलेल्या त्रुटी संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये आपणास कळविण्यात आलेल्या होत्या. त्याबाबत आपलेकडील संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये त्रुटीपूर्तता अहवाल सादर करणेत आला होता व सदर त्रुटी पूर्तते समवेत प्राप्त झालेला प्रस्ताव या कार्यालयाकडील सर्व्हेकक्षाकडे तपासणी करीता देण्यात आला होता.

कोणत्याही प्रस्तावांची सर्व्हे कक्षाकडून तपासणीमध्ये आढून आलेल्या त्रुटी व त्यानंतर या कार्यालयाकडील जमिन कक्षाकडून प्रस्तवाची त्याची छाननी केलेनंतर प्रस्तावांत आढळून आलेल्या त्रुटी हया संकलीत करुन त्या निम्नस्वाक्षरीकर्ता हयांचे स्वाक्षरीने पत्राद्वारे प्रकल्प यंत्रणेस कळविण्यात येतात.

तथापी या प्रस्तावांत आपलेकडील संदर्भिय पत्र क्रमांक 3 अन्वये प्राप्त प्रस्तावांत केवळ वनसर्व्हेक्षक यांचेकडून आपलेकडील प्रतीनीधी यांनी परस्पर त्रुटी प्राप्त करुन घेरुन केवळ त्याचा पूर्तता अहवाल सादर केला आहे. त्याची तपासणी वनक्षेत्र सर्व्हेक्षक यांचेकडून आलाहिदा करणेत येत आहे. तथापी याबाबत जमिन कक्षाकडून सदर प्रस्तावाची छाननी केली असतता त्यामध्ये खालील प्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

1. फार्म-अ भाग-1 मध्ये प्रस्तावांत सामील करणेंत आलेले दस्तऐवजांचे पृष्ठ क्रमांक नमुद करणेंत यावे याबाबत आपणास कळविण्यात आलेले होते तथापी त्याची पूर्तता करणेत आलेली नाही.
2. प्रकल्प यंत्रणेचे प्राधिकृत अधिकारी यांनी त्यांचे स्वाक्षरीखाली त्यांचा कार्यालयीन रबरी शिक्का/सिल उमटविणे आवश्यक आहे.
3. प्रस्तावातील क्षेत्र विवरण तक्त्यांत Infrastructure म्हणून दर्शविलेले क्षेत्रात कोणकोणते Infrastructure अभारण्यात येणार आहे, त्याचा Item WiseBreakup देणे आवश्यक असल्याबाबत आपणास कळविण्यात आलेले होते तथापी त्याची देखील पूर्तता केलेली दिसून येत नाही.
4. प्रस्तावांतील बाधीत होणारे वनक्षेत्राचे 7/12 उतारे आंग्ल भाषेत भाषातंरीत करून ते देखील प्रस्तवात सामील करणेबाबत सूचित करण्यात आलेले होते तथापी त्याची देखील पूर्तता करणेत आलेली नाही.
5. प्रस्तावात अन्य काही मराठी भाषेतील दस्तऐवज सामील असतील तर त्यांचे आंग्ल भाषेत भाषातंरीत करून ते देखील प्रस्तवात सामील करणे आवश्यक असलेबाबत कळविण्यात आलेले होते. तथापी त्याची पूर्तता करणेत आलेली नाही.
6. प्रस्तावांत बाधीत होणारे क्षेत्राचे बदल्यांत पर्यायी वनेत्तर क्षेत्र हे नांदेड वन विभागात प्रस्तावीत केल्याचे प्रस्तावांत दस्तऐवज सादर केलेले आहे. तथापी त्यामध्ये खालील प्रमाणे पूर्तता होणे आवश्यक आहे.

अ) प्रस्तावांत बाधीत होणारे क्षेत्राचे चे बदल्यांत देण्यात येणारे 275.00 हेक्टर क्षेत्र दर्शविणारे गाव/सर्व्हे नंबर व त्याचे क्षेत्राबाबत स्वतंत्र व उप वनसंरक्षक, नांदेड यांचेकडील सुधारीत (CA suitability certificate) प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे. आता प्रस्तावांत सामील केलेले प्रमाणपत्र सामाईक 395 हेक्टरचे दिसून येत आहे.

ब) त्याचप्रमाणे प्रस्तावांत बाधीत होणारे क्षेत्राचे चे बदल्यांत देण्यात येणारे 275.00 हेक्टर क्षेत्र दर्शविणारे सुधारीत नकाशे 1) टोपोशीट मॅप, 2) लोकेशन मॅप 3) व जीओडीजीटल मॅप प्रस्तावांत सामील करणे आवश्यक असून त्यावर उप वनसंरक्षक, नांदेड यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.

क) प्रस्तावांत सामील केलेली पर्यायी वनीकरण योजना ही उप वनसंरक्षक, नांदेड यांचे स्वाक्षरीची असणे आवश्यक आहे.

ड) त्याच प्रमाणे सदर पर्यायी वनेत्तर क्षेत्राचे 7/12 उतारा हे 275.00 हेक्टरचे मुळ व आंग्ल भाषेत भाषांतरीत करुन प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

ई) प्रस्तावीत वनेत्तर क्षेत्र हे मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशानुसार दिनांक 12.12.1996 नुसार वनसंज्ञेत येत नसलेबाबत उप वनसंरक्षक, नांदेड यांचे आंग्ल भाषेतील विहित नमुन्यांतील प्रमाणपत्र प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

फ) पर्यायी वनेत्तर क्षेत्र 275 हेक्टरची KML File सॉफट् कॉपीमध्ये सीडी मध्ये प्रस्तावांत सामील करण्यात यावी.

7. क्षेत्र विवरण तक्त्यातील धरणाखाली क्षेत्राची खात्री केले असता खालील प्रमाणे पुर्तता होणे आवश्यक आहे.

अ) मौजे महाण ता.अलिबाग येथील प्रस्तावात समाविष्ठ असणारे क्षेत्राची गट एकत्रीकरण योजना उपलब्ध करून दिलेले नसल्याने तसेच सर्व क्षेत्राचे 7/12 उपलब्ध करून दिलेले नसल्याने खाजगी वन क्षेत्राबाबत अचुक खात्री करता येत नाही. तरी गट एकत्रीकरण योजना व बाधीत होणारे क्षेत्राचे 7/12 उत्तारा उपलब्ध करून देण्यात यावे.

ब) मौजे शिहू ता. पेण येथीली कं.नं. 210, स.नं. 150/2 व कं.नं. 211, स.नं. 151 चे सर्व्हे नंबर नमुद केलेले आहे, तथापी सदर सर्व्हे नंबरपैकी बाधीत होणारे वनक्षेत्र क्षेत्र विवरण तत्क्यात नमुद केलेले नाही.

क) मौजे रामराज ता. अलिबाग येथील प्रस्तावात समाविष्ठ असणारे क्षेत्राची गट एकत्रीकरण योजना उपलब्ध करून दिलेले नसल्याने तसेच सर्व क्षेत्राचे 7/12 उपलब्ध करून दिलेले नसल्याने खाजगी वन क्षेत्राबाबत अचुक खात्री करता येत नाही. तरी गट एकत्रीकरण योजना व बाधीत होणारे क्षेत्राचे 7/12 उत्तारा उपलब्ध करून देण्यात यावे.

8. क्षेत्र विवरण डाव्या व उजव्या कालव्यामध्ये समाविष्ठ होणारे क्षेत्राबाबत छाणणी केली असता खालील प्रमाणे पुर्तता होणे आवश्यक आहे.

अ) मौजे महाण येथील वनेत्तर क्षेत्रामध्ये दर्शविणारे गट नंबर चे सर्व्हे नंबर नमुद केलेले नाहीत. तसेच मौजे महाण या गावाची संपुर्ण गट एकत्रीकरण योजना उपलब्ध करून दिलेली नसल्याने खाजगी वनाचे क्षेत्राबाबत खात्री करता आलेली नाही.

ब) मौजे रामराज ता. अलिबाग येथील गट नंबर 112 व 193 चे क्षेत्र खाजगी वनापैकी आहे, तथापी सदर क्षेत्र राखीव वन व कलम 35 असे नमुद केलेले आहे, तरी त्यामध्ये योग्य ती दुरूस्ती होणे आवश्यक आहे. तसेच मौजे रामराज येथील वनेत्तर क्षेत्रामध्ये दर्शविणारे गट नंबर चे सर्व्हे नंबर नमुद केलेले नाहीत. तसेच मौजे रामराज येथील सदर प्रकल्पात बाधीत होणारे क्षेत्राची गट एकत्रीकरण योजना उपलब्ध करून दिलेली नसल्याने खाजगी वनाचे क्षेत्राबाबत खात्री करता आलेली नाही.

क) मौजे मालाडे, ताजपुर, भोनंग, मोरांडे, बोरघर, महाजने, बेलोशी, वळवली, मल्याण, घोटवडे, कुणेगांव, उसर, खानाव, वेलवली, वडाव बु., बामणगावी, वडाव खुर्द, भादाणे, डावले, मोरखोल, भिलजीखार, फरणापुर, चिंचोटी, चौल, भापळे, वासखार, ता. अलिबाग यागावांतील बाधीत होणारे वनेत्तर क्षेत्राचे सर्व्हे नंबर नमुद करण्यात आलेले नाही. तरी सदर गावाची वनेत्तर क्षेत्राचे सर्व्हे नंबर नमुद करण्यात यावेत व गट एकत्रीकरण योजना उपलब्ध करून देण्यात यावे, जेणेकरून सदर क्षेत्राचे खाजगी वनाची खात्री करता येईल.

9. प्रस्तावांत सामील केलेला पाणलोट विकास आराखडा (Catchment Treatment Plan) मध्ये अलिबाग वन विभाग व रोहा वन विभागाकडील काही भाग दिसून येत आहे. तथापी सदर आराखडा तयार करताना वन विभागाकडील संबंधीत अधिकारी यांचे मत घेतलेले दिसून येत नाही. तरी सदर आराखडयात प्रस्तावीत कामाबाबत सहा. वनसंरक्षक अलिबाग व वन परिक्षेत्र अधिकारी, अलिबाग/नागोठणे व सहा. वनसंरक्षक, रोहा व वन परिक्षेत्र अधिकारी, रोहा यांचेमार्फत खात्री होणे व त्यांचे अभिप्राय घेऊन तयानुसार आराखडयांत सुधारणा करणे आवश्यक आहे.

10. प्रकल्पांत बाधीत होणारे वनक्षेत्रांतील वृक्षतोडीबाबतचे अंदाजपत्रक व त्या समवेतचे सॅम्पल प्लॉटींग व झाडांची यादी आंग्ल भाषेंत तयार करुन प्रस्तावांत सामील करणे आवश्यक आहे.

11. प्रस्तावांत पान क्रमांक 157अ वर जोडण्यात आलेले प्रमाणपत्र हे 228 हेक्टर बाबत आहे. तरी आवश्यकतेनुसार सुधारीत करुन घेऊन ते प्रस्तावांत सामील करावे.

12. प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर सादर करणेत आलेला नाही. त्यामुळे ऑनलाईन प्रणालीवर या कार्यालयास प्राप्त झालेला नसल्याने ऑनलाईन प्रस्ताव तपासता आलेला नाही. तरी प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर सादर करणेत अत्यंत आवश्यक असल्याने तो सादर करणेत यावा.

तरी वरीलप्रमाणे त्रुटींची पुर्तता करुन फेर प्रस्तावाचा संच व प्रस्ताव ऑनलाईन प्रणालीवर देखील या कार्यालयास सादर करावा.

(आशिष ठाकरे, भा.व.से.)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

प्रतिलिपीः- जिल्हाधिकारी, रायगड- अलिबाग यांना माहितीसाठी सस्नेह अग्रेषित.

प्रतिलिपी- उप वनसंरक्षक, नांदेड यांना माहिती व जरूरी कार्यवाहीसाठी.

प्रतिलिपी- उप वनसंरक्षक, रोहा यांना माहिती व जरुरी कार्यवाहीसाठी.

प्रतः- सहा. वनसंरक्षक, अलिबाग यांचेकडे माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रतः- वन परिक्षेत्र अधिकारी, अलिबाग/नागोठणे यांना माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.